


# मोबाइलसाठी एक पिशवी तयार करा

ह्या वीडियो मध्ये तुम्ही सेलफोन साठी एक स्लिंग पाउच बनवायला शिकणार



आपल्याला लागणार एक नौ बाइ तेरा इंचाचा कपडाचा तुकडा, तीन एकाच साइज़ चे कपडाचे तुकडे जे तुमच्या सेलफोन पेक्षा तीन इंचान्नी मोठे आहेत. यातला एक तुकडा प्रिंटेड असावा. सजवण्यासाठी एक बॅटन एक इंचाचा वेलक्रोव पाउच बंद करण्यासाठी आणि एक लांब दोरी पाउच लटकवण्यासाठी.

तीन एकसारख्या तुकद्यांना एकमेकांवर ठेवा आणि प्रिंटेड कपडाला त्याच्या मध्ये ठेवा. प्रिंटेड तुकड्याची सुलट बाजू आणि वरच्या तुकड्याची सॉलिड बाजू वीडियो मध्ये दाखवल्या प्रमाणे समोरासमोर असली पाहिजे.

आता उजवी बाजू नीट एकत्र करून बीडीत पीनानी जोडा. जोडलेले कापड मशीन कडे आणा. स्टिच पॅटर्न्स सेलेक्टर नॉब ला ए आणि स्टिच लेंथ ला २-३ च्या मध्ये ठेवा.

पीना लावलेली बाजू प्रेसर फुट खाली नीट ठेवा. प्रेसर फुट खाली करून शिवायला सुरूवात करा. शिवताना पिना काढत जायचा विसरू नका.

दुसर्या टोका कडे आल्यावर रिवर्स स्टिच सेलेक्टर दाबा आणि काही रिवर्स टाके घ्या. त्याला रिलीस करून आता शेवट पर्यंत शिवा. प्रेसर फुट वर घेऊन कापड काढा आणि एक्सट्रा धागे थ्रेड कटर नि कापा.



आता तुम्ही कपडाची उजवी बाजू शिवली आहे. आता कापड उघडा. सॉलिड आणि प्रिंटेड बाजू एकमेकांच्या बाजूला असणार ह्याला सपाट करा.

दोन्ही बाजुंचे एक्सट्रा धागे कापून टाका. आता शिवलेले तुकडे एका मोठ्या तुकड्यावर ठेवा. दोघांची सुलटबाजू समोरासमोर असली पाहिजे.
काठ संरेखित करा, पिना लावून तुकडे एकत्र जूडवून टिकवा. आता पिना लावलेली बाजू शिवा.

कापड प्रेसेर फुट बरोबर संरेखित असल्याची काळजी घ्या.
रिवर्स स्टिच सेलेक्टर ने टाके लॉक करा. पूर्ण बाजू दुसर्या टोकापर्यंत शिवा. शेवटला स्टिच लॉक करा.
प्रेसर फुट उचला, कपडा काढून घ्या. आणि थ्रेड कटर नी धागे कापून टाका. शिवलेल्या कपडा उघडून लांबी प्रमाणे एक घडी घाला. काठांनी संरेखित करा.








आता कपडाची लांबी फुट च्या खाली आणा.
रिवर्स बटन वापरुन टाके लॉक करा, आणि उघड्या बाजूला शिवत जा.
जॉइंट येण्याआधी मशीन पॉज़ करा. कड्यांनी संरेखित करा, दोन्ही बाजूला अलोवेन्स द्या आणि शिवत राहा.
कोपरा आला की आकारा प्रमाणे कापड फिरवा.
वर्तुळाकार सावकाश शिवा. गरज असलेल्या प्रेसर फुट उचलून कपडाला फिरवा.

दुसरी बाजू सावकाश वर्तुळवर तोपर्यंत शिवट राहा जोपर्यंत तुम्ही सुरूवाती कडे येत नाहीत. रिवर्स स्टिच खाली करून शेवटला टाके लॉक करा.
प्रेसर फुट उचला आणि कापड काढून घ्या.



एक्सट्रा धागे कापून टाका, आता तुमच्याकडे तीन शिवलेल्या बाजू आहेत आणि एक मोकळी बाजू आहे.
क्

लॅप ला बरोबर आकार देण्यासाठी सीम अलोवेन्स ला बरोबर कापा. स्टिच लाईन कापली जात नाहीए याची काळजी घ्या.



आता शिवलेल्या तुकड्याची आतली बाजू बाहेर काढा, आणि आकार बरोबर आला आहे की नाही ते पहा. जर गरज लागली तर आकार सुधारायला पिना वापरा.

तुकडा हाताने नीट करा, म्हणजे शीलाई सपाट होईल. बरोबर आकार आल्यावर वरच्या उघड्या बाजूची काठ अर्ध्याइंचाने दुमडा.



आता दुमडलेल्या भागाला प्रेसर फुट खाली आणा. दुमडलेली काठ शिवून टाका. प्रेसर फुट उचला कापड काढा आणि एक्सट्रा धागे कापून टाका.




आता शिवलेल्या टाक्याची उलटी बाजू वर ठेवा. वेलक्रो घ्या आणि त्याच्या दोघी बाजू बेगवेगळ्या करा. कर्वसाइडच्या मध्ये वेल क्रो ची रफ बाजू अर्धा इंच सोडून लावा.

वेलक्रो ला  या जागी सर्व बाजूंनी शिवून घ्या. बॉक्स स्टिच वापरा म्हणजे टाके मजबूत येतील. कोपर्यांनवरुन जाताना सुई खाली ठेवा. प्रेसर फुट उचला आणि कपडाला लागेल तसे फिरवा. अस सगळा कोपर्यांनवरुन करा. रिवर्स स्टिच सेलेक्टर वापरुन टाके लॉक करा.





एकदा झाले की प्रेसर फुट उचला, फॅब्रिक काढा आणि धागे कापून टाका. तुकड्याची खालची बाजू घडी करा, म्हणजे शिवलेली काठ फ्लॅप सीन वर येईल, फ्लॅप फोल्ड करा आणि खालच्या बाजूला कपडावर मार्किंग करा.



काठांवर वॉटर सॉल्युबल मार्कर वापरा. वेल क्रो च्या दोन्ही बाजू मार्कवर ठेवा, फोल्ड उघडा आणि फॅब्रिक ला सुई मशीन कडे न्या. वेल क्रो ला चारी बाजूंनी शिवून टाका.

तुकडा काढून दोन्ही कडचे एक्सट्रा धागे कापून टाका. आता तुकडा उलटी बाजू वर असेल असा ठेवा, फोल्ड करा म्हणजे वरची बाजू सीम लाईन वर येईल. आता फक्त उघड्या बाजू शिवायच्या आहेत आणि स्लिंग लावायची आहे.







तुम्ही त्याच्यासाठी रिबन वापरु शकतात किंवा स्ट्रॅप उरलेल्या कपडातून बनवू शकतात. रिबनचा एक टोक वरच्या काठांमधे ठेवा, रिबनला प्रेसर फुट खाली आणा, प्रेसर फुट खाली करा. काठांना शिवा आणि रिवर्स स्टिचन लॉक करा. शिवताना काठांना जवळ शिवा आणि शेवट पर्यंत शिवत राहा. शेवटला रिवर्स स्टिच ने स्टिच लॉक करा.
जर रिबन दूमडलेली असेल तर ती सरळ करा. रिबनचा दुसरा टोक दुसर्या बाजूला ठेवा. आता जशी तुम्ही शिवली तशीच ही बाजू पण शिवा. काळजी घ्या की काडा नीट लागत आहेत. शेवटला रिवर्स टाके घ्या. मशीन थांबवून प्रेसर फुट उचला, कपडा काढून घ्या आणि एक्सट्रा धागे कापून टाका. आता तुमचा बेसिक पाउच तयार आहे, फ्लॅप ला वेल क्रो च्या बाजूने टाके लपवण्यासाठी एका डेकोरेटीव फूलाचा किंवा सुंदर बटनाचा वापर करा. क्रॉशे फूल जी बाजारात तयार मिळतात ती तुम्ही टाक्यांवर लावू शकतात. टपरिक लू चा एक छोटा डॉट लावून फूल किंवा बटन कापडावर चिकटवा. थोडासे प्रेशर देऊन ते कपडावर तसेच ठेवा. झाल! तुमच मोबाईल पाउच आता पूर्णपणे तयार आहे, तुम्ही वेगवेगळ्या रंगात आणि कपडांत आणि सजावटी सामाना बरोबर एक्सपेरिमेंट करू शकतात. प्रत्येक वेळा पद्धत तीच राहणार आहे, तुमच पाउच तयार झाल्यावर त्याला ऐटीत लटकवा आणि आमच्याबरोबर पण शेअर करा.